मी तिला हो म्हटले असते

तर आयुष्य वेगळेच घडले असते

म्हणजे असे की,

तिची मुले आमची ठरली असती

आणि माझी मुले नसतीच नसती.

आणि असेही की,

आमचे व्यवसाय वेगळे आणि गुंतागुंतही

उमाळे-उसासे वेगळे आणि पुन्हा खंतही.

किंवा कदाचित असेही

नातीच सारी बदलल्यामुळे भेटी-गाठीही

मुलांचीच जनुके बदलल्याने, नातवंडेही.

पण,

हे जगच नवे, जर-तरच असण्या-नसण्याचे

कल्पनेने केवळ, रंगच बदलून टाकणारे, वास्तवाचे!

८.१.२०१९